# ६. महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

**(१) इ.स.१९९२ मध्ये........ या राज्यात मद्यपानविरोधी चळवळ सुरू करण्यात आली.**
(अ) महाराष्ट्र
(ब) गुजरात
**<u>(क) आंध्र प्रदेश</u>**
(ड) उत्तराखंड

(२) भारत सरकारने १९७५ मध्ये.......... यांच्या अध्यक्षतेखाली महिला आयोगाची स्थापना केली.
**<u>(अ) डॉ.फुलरेणू गुहा</u>**
(ब) उमा भारती
(क) वसुंधरा राजे
(ड) प्रमिला दंडवते

**२. पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा व लिहा.**


| नेतृत्व | संघटना |
|---|---|
| (१) सौदामिनी राव | स्त्रीमुक्ती आंदोलन समिती |
| (२) विदया बाळ | नारी समता मंच |
| (३) प्रमिला दंडवते | महिला दक्षता समिती |
| (४) ज्योती म्हापसेकर | महिला आयोग |

**उत्तर:**

**चुकीची जोडी:** <u>ज्योती म्हापसेकर महिला आयोग</u>
**दुरुस्त केलेली योग्य जोडी:** <u>ज्योती म्हापसेकर-' मुलगी झाली हो' हे पथनाट्य</u>.

**३. संकल्पनाचित्र तयार करा.**

**उत्तर: महिलांच्या संदर्भातील कायदे**



| इ.स. १९५२ | इ.स. १९६१ | इ.स. १९६१ | इ.स. १९८४ | इ.स. १९८८ |
|---|---|---|---|---|
| स्त्री-हक्कविषयक सुधारणा कायदा | प्रसूती सुविधा अधिनियम कायदा | प्रसूती सुविधा अधिनियम कायदा | हुंडाबंदी सुधारणा कायदा | सती प्रतिबंधक कायदा |

**४. संकल्पना स्पष्ट करा.**

**(१) पोटगी.**

**उत्तर:** (१) एखादया विवाहित महिलेला तिच्या नवऱ्याने घटस्फोट दिल्यावर तिच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून तिला नवऱ्याने दरमहा ठरावीक रक्कम देणे, याला 'पोटगी' असे म्हणतात.
(२) १९५२च्या कायद्यानुसार भारत सरकारने हिंदू स्त्रियांना पोटगीचे अधिकार दिले
(३) पोटगीच्या अधिकारामुळे घटस्फोटित स्त्रियांचे जीवन सुसहय बनले.
(४) भारतात विविध धर्मीयांसाठी पोटगीचे वेगवेगळे कायदे आहेत.

**(२) अल्पसंख्याक.**

**उत्तर:** (१) एखादया समाजात धार्मिक, भाषिक किंवा वांशिकदृष्ट्या संख्येने कमी असलेल्या व्यक्तींच्या समूहाला 'अल्पसंख्याक' असे म्हणतात.
(२) या अल्पसंख्याकांना आपल्या संस्कृतीचे, भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी संविधानाने विशेष अधिकार दिलेले आहेत.

**५. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

**(१) स्त्री मुक्ती चळवळीस सुरुवात झाली.**

**उत्तर:** (१) महाराष्ट्रात १९७५ मध्ये स्त्री-मुक्ती संघर्ष समितीच्या वतीने स्त्रियांसाठी राज्यव्यापी परिषद झाली.
(२) १९७८ मध्ये या समितीने लिंगभेद, जातिभेद या विरोधात संघर्ष करण्याचे जाहीर केले.
(३) अनेक महिलांनी नियतकालिके, पथनाट्ये, गीतसंग्रह आणि संस्थागट स्थापणे असे उपक्रम सुरू केले. स्त्री-अत्याचारविरोधी परिषदा घेण्यात आल्या.
(४) अनेक पक्षांनी, संघटनांनी हुंडा, स्त्री-भ्रूणहत्या, कौटुंबिक अत्याचार या प्रश्नांवर संघर्ष केले. स्त्री-प्रश्नांवर संशोधने सुरू झाली. या सर्व कृतीतूनच महाराष्ट्रात स्त्री-मुक्ती चळवळीस सुरुवात झाली.

**(२) १९८४ मध्ये हुंडाबंदी सुधारणा कायदा करण्यात आला.**

**उत्तर:** (१) भारतात १९६१ चा हुंडाबंदी कायदा अस्तित्वात असूनही अनेक स्त्रियांचे संशयास्पद मृत्यू घडतच होते.
(२) या प्रकारांची चौकशी झाल्यावर या घटनांमागे हुंडा हेच कारण असल्याचे उघड होत होते.
(३) पोलिसांसह सर्व यंत्रणा हुंडाबंदी कायद्यात सुधारणा करून तो अधिक कडक केला पाहिजे, असेच मत देत होत्या.
त्यामुळे स्त्रियांना अधिक संरक्षण देण्यासाठी १९८४ मध्ये हुंडाबंदी सुधारणा कायदा करण्यात आला.

**(३) अस्पृश्यतेच्या रूढीवर कायद्याने बंदी आणली.**

**उत्तर:** (१) भारतात अनेक वर्षे अस्पृश्यता पाळली जात असे. या रूढीमुळे अस्पृश्यांचे जीवन हलाखीचे बनले होते.
(२) स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय या मूल्यांचा पुरस्कार केला.
(३) हे घटनादत्त अधिकार अस्पृश्य समाजालाही मिळणे आवश्यक होते.
म्हणून अस्पृश्यतेची ही हीन रूढी नष्ट होण्यासाठी सरकारने या रूढीवर कायद्याने बंदी आणली.

**(४) संविधानाने अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत.**

**उत्तर:** (१) भारतात विविध धर्माचे, पंथांचे, संस्कृतींचे आणि विविध भाषिक लोक राहतात.
(२) यातील अल्पसंख्य समूहांना आपली संस्कृती, परंपरा जपण्याचा, आपली भाषा विकसित करण्याचा हक्क असला पाहिजे.
(३) आपल्या शिक्षण संस्था स्थापन करता आल्या पाहिजेत. यासाठीच संविधानाने अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत.

**६. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

**(१) चिपको आंदोलनाची माहिती लिहा.**

**उत्तर:** (१) चित्रातील या आंदोलनाला 'चिपको आंदोलन' असे म्हणतात. १९७३ च्या दरम्यान हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या प्रदेशात हे आंदोलन सुरू झाले.
(२) हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशात असणाऱ्या जंगलातील झाडे व्यापारी उद्देशाने मोठ्या प्रमाणात तोडली जाणार होती.
(३) त्या विरोधात चंडिप्रसाद भट्ट आणि सुंदरलाल बहुगुणा यांनी मोठे आंदोलन उभे केले.
(४) या आंदोलनात स्त्रियांनी हातात हात घालून वृक्षांभोवती फेर धरण्याचे तंत्र स्वीकारले.
(५) वृक्षतोड होऊ नये; म्हणून झाडांना मिठी मारून त्यांचा बचाव करणे, असे आंदोलनाचे स्वरूप असल्याने, या आंदोलनाला 'चिपको आंदोलन' असे म्हटले गेले.
या आंदोलनामुळे वृक्षतोड तर थांबलीच; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे स्त्री-शक्तीचा प्रभाव समाजाला अनुभवता आला.

**(२) मानव अधिकार संरक्षण कायद्याची माहिती लिहा.**

**उत्तर:** (१) १९९३ साली केंद्र शासनाने स्त्री-पुरुषांवरील अन्याय दूर करण्यासाठी 'मानव अधिकार संरक्षण कायदा संमत केला. या कायद्याने 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची आणि राज्य मानवाधिकार आयोगा'ची स्थापना करण्यात आली.
(२) सामूहिक अत्याचार, घटस्फोटित महिलांची सामाजिक स्थिती, स्त्रिया व सुरक्षित कार्यस्थळ इत्यादी गोष्टींवर कायद्याने प्रभावी उपाययोजना करून स्त्रियांवरील अन्याय कमी करण्यास मदत केली आहे.
(३) स्त्री-पुरुषांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात या कायदयाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

**७. पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

**स्त्रियांची एकत्रित शक्ती विविध क्षेत्रांत सुधारणात्मक बदल घडवून आणू शकते, हे विविध उदाहरणांनी स्पष्ट करा.**

**उत्तर:** स्त्रियांची एकत्रित शक्ती विविध क्षेत्रांत सुधारणात्मक बदल घडवून आणू शकते, हे पुढील उदाहरणांवरून सिद्ध होते
(१) ऐन दिवाळीत अनेक वस्तू बाजारातून गायब होऊन महाग विकल्या गेल्या, या विरुद्ध स्त्रियांनी काढलेल्या ‘लाटणे मोर्चा 'ला यश मिळाले.
(२) वृक्षतोडीविरुद्ध सुरू झालेल्या चिपको आंदोलनात किंवा राजस्थानातील बिष्णोईंच्या आंदोलनात स्त्रियांचा वाटा मोठा होता.
(३) आंध्र प्रदेशात मद्यपानविरोधी चळवळीत स्त्रियांनी अरक विक्रीची दुकाने बंद पाडल्यामुळे तेथील सरकारला दारूविक्री विरोधात कडक धोरण स्वीकारावे लागले.
(४) महाराष्ट्रात झालेल्या हुंडाविरोधी आंदोलन, स्त्री अत्याचारविरोधी आंदोलन, स्त्री-मुक्ती संघर्ष समिती इत्यादींमध्ये स्त्रिया सक्रीय होत्या, म्हणूनच स्त्रियांवरील अत्याचार कमी व्हायला मदत झाली.